नि.दि.दा.क्र.९/२०१९
वंदना वि. बबन
निशानी - ३९ लगत

**पुढील उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र. ०१ तर्फे श्री. ए. एम. देवळे वकील साहेब**

६. सदरचा दावा मी स्वमर्जीने केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी १ ने खोटेपणाने माझे आईचे नाव कमी केले हे मी खोटे सांगते. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतीमध्ये माझे आईला कोणताही हक्क नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला देखील सदर वाद मिळकतीमध्ये हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला वाटप मागण्याचा व विक्रीपत्र रद्द करुन मागण्याचा अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी मुदतबाह्य दावा दाखल केला आहे. हे मला माहिती आहे की, प्रतिवादी क्र. २ ने स्वतंत्र दावा दाखल केला आहे. आम्हा भावंडामध्ये वाटप झालेले नाही. हे मला माहिती नाही की, माझे आजोबा रामाजी यांच्या मृत्युनंतर वाद मिळकतीचे वाटप झाले होती किंवा नाही. माझे म्हणण्याप्रमाणे वाद मिळकत अजुनही एकत्रित आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देते, हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र. ०५ तर्फे श्री. पी. एस. सायरे वकील साहेब**

७. माझे शिक्षण दहावी झाले आहे. माझे सासरी शेतजमिन आहे, परंतु माहेरी शेत जमिन नाही. साक्षिदार पुन्हा सांगते की, माहेरी आहे सासरी नाही. वाद मिळकतीचा 7@12 उतारा मी पाहिलेला नाही. मी वाद मिळकतीवर कधीही गेलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत प्रतिवादी क्र. ०१ हे वाहात होते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४-२००५ पर्यंत प्रतिवादी क्र. ०१ सोबत माझे चांगले संबंध होते व त्याचेकडे येणेजाणे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०१ नेहमी

शेतीबद्दल सांगत असे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पासुन प्रतिवादी क्र. ०५ वाद मिळकत कब्जे वहीवाटत आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०१ ने प्रतिवादी क्र. ०५ वाद मिळकतीची जमिन विक्री केली आहे याची माहिती मला सन २००४ साली होती.

८. सन २०१८ साली वाद मिळकत प्रतिवादी क्र. ०५ ला विक्री केली आहे हे माहिती झाले. हे मला माहिती नाही की, सन २००४ पासुन प्रतिवादी क्र. ०५ चे नाव वाद मिळकतीच्या 7@12 अभिलेखावर दाखल होते. हे म्हणणे खरे आहे की, ज्याच्या नावे 7@12 असतो तोच ती शेती वाहात असतो. हे मला माहिती नाही की, प्रतिवादी क्र. ०५ विक्रीपत्राची सांक्षाकीत प्रत मी केंव्हा प्राप्त केली. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पर्यंत प्रतिवादी क्र. ०१ वाद मिळकत वाहात होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ०१ हा वाद मिळकतीचा मालक आहे याची कल्पना आजु-बाजुच्या लोकांना होती.

९. हे मला माहिती नाही की, प्रतिवादी क्र. ०५ हा प्रामाणिक खरेदीदार आहे. प्रतिवादी क्र. ०५ नोटीस दिली असेल? हे मला आठवत नाही की, आई मरेपर्यंत शारीरीक दृष्ट्या सदृढ होती. मी विक्रीपत्राची प्रत न्यायालयात दाखल केली आहे. प्रतिवादी क्र. ०५ च्या विक्रीपत्राची प्रत कोणत्या वर्षी काढली किंवा कोणाकडुन प्राप्त हे सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. ०१ वाद मिळकतीतुन मला हिस्सा देत होता. वाद मिळकतीचे क्षेत्रफळ सांगु शकत नाही. वाद मिळकतीच्या चतुर्सिमा सांगु शकत नाही.

**पुढिल उलटतपास तोंडी विनंतीवरुन तहकुब**

**श्रवणोत्तर स्विकृत**
**स्वा/-**
**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**
**दिंनाक:-०६/०२/२०२३**

**समक्ष**
**स्वा/-**
**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**

**पुढील उलटतपास शपथेवर प्रतिवादी क्र. ०५ तर्फे श्री. पी. एस. सायरे वकील साहेब**

१०. मला 7@12 समजत नाही. वाद मिळकतीचा 7@12 उतारा मी पाहीलेला नाही. दावा दाखल करण्यासाठी मी विक्रीपत्र काढले होते. हे म्हणणे खरे आहे की, 7@12 उतारा विक्रीपत्र जे काढले ते ही मी यादाव्यात दाखल केले आहे. परिच्छेद क्र.२ अअधोरेखीत भाग चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील मजकुर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीलेला नाही. रिषीने दावा दाखल करे पर्यंत प्रतिवादी क्र.१ सोबत सन २०१२-२०१३ पर्यंत माझे चांगले संबंध होते. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१२ - २०१३ पर्यंत प्रतिवादी वाद मिळकतीबाबत मला सांगत होता.

११. आई मयत झाल्यानंतर ते दावा दाखल करे पर्यंत मी वाद मिळकतीचा ७/१२ उतारा पाहीला नव्हता. हे मला माहीत आहे की, आई वडील मयत झाल्यानंतर त्यांच्या मुलांची नावे ७/१२ उता-यावर दाखल करावी लागतात. मी सज्ञान झाल्यानंतर ७/१२ उता-यावर माझे आईचे नाव कमी करून माझे नाव दाखल केले नाही कारण प्रतिवादी क्र.१ ने शेती विकणार आहे असे कधी ही सांगितले नाही. आई मयत झाल्यानंतर मी वाद मिळकतीचे कागदपत्रे पाहण्याचा कधी ही प्रयत्न केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे आईचे नाव ७/१२ उता-यावर दाखल नव्हते म्हणून मी कागदपत्र पाहीले नाही. साक्षीदार सांगते की, माझे आईचे नाव दाखल होते किंवा नाही हेच मला माहीत नव्हते.

१२. आता मला प्रतिवादी क्र.५ चे खरेदीपत्र दाखविण्यात आले. खरेदीपत्रासोबत जोडलेल्या 7@12 उता-यात प्रतिवादी क्र.१ व गयाबाई तिचे नाव देखील दिसून येते. 7@12 उता-यावर ज्यांची नावे दाखल असतात ते कब्जेदार व मालक समजले जातात असे म्हणणे बरोबर होईल. हे मला आठवत नाही की, गयाबाई सन २००३ साली मयत झाली. हे म्हणणे खरे

आहे की, मी दाखल केलेल्या 7@12 उता-यावरून प्रतिवादी क्र.१ हा सन २००३ साली वाद मिळकतीचा मालक असल्याचे दिसून येते. हे म्हणणे खरे आहे की, सन २००३ साली प्रतिवादी क्र.१ ला सर्वे क्र.१० विक्री करण्याचा मालक म्हणून अधिकार होता. साक्षीदार सांगतो की, प्रतिवादी क्र.१ ने त्यावेळी माझ्या वडीलांना विचारणे आवश्यक होते त्यावेळी आम्ही लहान होतो.

**१३**. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांचा वाद मिळकतीमध्ये अधिकार नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ याला वाद मिळकत विक्री करण्याचा पुर्ण अधिकार होता त्यामुळे प्रतिवादी क्र.५ हा प्रमाणीक खरेदीदार आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पासून प्रतिवादी क्र.५ हा वाद मिळकत सर्वे क्र.१० आज आखेरपर्यंत वाहत आहे व त्याचे नाव अभिलेखात देखील दाखल झाले आहे. प्रतिवादी क्र.५ चे नाव कमी करण्यासाठी मी महसुल विभागाकडे अर्ज केला होता. मी त्याबाबतचा पुरावा दाखल करू शकेल. हे म्हणणे खरे आहे की, सन २००४ पर्यंत प्रतिवादी क्र.१ हा वाद मिळकत वाहत होता, त्यामुळे आजुबाजूच्या लोकांना प्रतिवादी क्र.१ मालक आहे असे माहीत होते. हे मला माहीत नाही की, माझ्या आईने वाद मिळकतीचा शेतसारा भरला त्याबाबत पावत्या आहे किंवा नाही.

**प्रश्न.** रिषीच्या दाव्यात कोणत्या प्रकारची मागणी केली आहे?

**उत्तर.** रिषीने आईचा हिस्सा एकटयाकरीता मागितला आहे. सन २०१८ साली रिषीने दावा केला आहे हे मला समजले.

**१४**. मी प्रतिवादी क्र.५ चे विक्रीपत्र पाहीले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ ने प्रतिवादी क्र.५ ला करून दिलेले विक्रीपत्र माझ्यावर बंधनकारक राहील. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ ने

प्रतिवादी क्र.५ ला वाद मिळकत विक्री केली आहे याची माहीती मला सन २००४ पासून माहीत होते. हे म्हणणे खरे नाही की, मला दावा दाखल करण्याचा कोणता ही अधिकार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइया आईचा वाद मिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, माइया आईचा हक्क नसल्यामुळे मला देखील वाद मिळकतीमध्ये कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.५ ला मानसीक त्रास देण्याकरीता खोटा दावा दाखल केला आहे. मी खोट सरतपास दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, हा दावा मुदत बाहय दाखल केला आहे.

उलटतपास पुर्ण.

फेर-तपास नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**
**दिंनाकः-२३/०२/२०२३**

**(ओ. जे. कुलकर्णी)**
**दिवाणी न्यायाधीश क.स्तर**
**पारशिवनी.**